# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 28 September 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: २८ सप्टेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

*ठळक बातम्या*

- **मंकी पॉक्सचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून मार्गदर्शक सूचना जारी**
- **विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या राजकीय तसंच प्रशासकीय आढावा बैठका**
- **नांदेड जिल्ह्यात नेरली इथं दुषीत पाणी प्यायल्याने पंधरा मुलांसह दोनशे जणांना विषबाधा**
- **जागतिक पर्यटन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा –रत्नागिरी जिल्ह्यातल्या कर्दे गावाला कृषी पर्यटनासाठी सर्वोत्कृष्ट पुरस्कार जाहीर**

**आणि**

- **मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीचा उपांत्य फेरीत प्रवेश**

*सविस्तर बातम्या*

मंकी पॉक्स या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीनं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. विषाणूच्या प्रादुर्भाव–प्रसारावर लक्ष ठेवणे, उपचारांसाठी वैद्यकीय सुविधा तसंच विलगीकरणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे, या बाबींकडे स्थानिक प्रशासनाने लक्ष देण्याचे निर्देश मंत्रालयानं दिले आहेत.

दरम्यान, शासनानं यकृताच्या नॉन–अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज या आजारावरील सुधारित मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रशिक्षण पुस्तिका जारी केली आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यातल्या शिवाजीनगर ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचं उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण होणार आहे. स्वारगेट ते कात्रज या भुयारी मार्गाचं भुमिपूजनही यावेळी होणार आहे.

दरम्यान, पंतप्रधान उद्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम प्रसारित होईल.

****

महाराष्ट्रातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकानं काल विविध राजकीय पक्षांसोबत तसंच ठाणे, पुणे, पालघर आणि मुंबईसह विविध जिल्ह्यांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. उर्वरित विभागांचा आढावा आज घेतला जाणार आहे.

भाजपा आमदार विधिज्ञ आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे सूचना मांडल्या आहेत. मतदानाचा दिवस सलग सुट्ट्यांच्या दिवशीचा असू नये, प्रत्यक्षात बदली झालेल्या सर्व मतदारांना मतदानाचा हक्क मिळावा अशा सूचनांचं पत्र शेलार यांनी आयोगाकडे सादर केलं आहे.

****

माजी मंत्री तथा काँग्रेचे ज्येष्ठ नेते रोहिदास चुडामण पाटील यांचं काल धुळे इथं निधन झालं, ते ८४ वर्षांचे होते. विविध मंत्रिपद भुषवलेल्या रोहिदास पाटील यांनी काँग्रेस पक्षातही अनेक पदं भुषवली. त्यांच्या पार्थिव देहावर आज अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा छत्रपती संभाजीनगर इथं काल पार पडला. बागडे यांनी नुकतेच ऐंशीव्या वर्षात पदार्पण केलं, त्यानिमित्त केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. बागडे यांच्या जीवन प्रवासावर आधारित 'माझा प्रवास' या पुस्तकाचं प्रकाशन यावेळी करण्यात आलं.

****

जागतिक पर्यटन दिन काल साजरा झाला. 'पर्यटन आणि शांतता' ही यंदाच्या पर्यटन दिनाची संकल्पना आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय पर्यटन मंत्रालयानं सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव स्पर्धेचे निकाल काल जाहीर केले. विविध आठ श्रेणींमध्ये ३६ गावांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये कृषी पर्यटनासाठीचा पुरस्कार रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यातल्या कर्दे गावाला जाहीर झाला आहे. गावाचे सरपंच सचिन तोडणकर यांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या...

**कर्दे गावाने फक्त कोकणची जी संस्कृती आहे, ग्रामीण जीवन आहे, ते प्रेझेंट केलं होतं आणि त्या प्रेझेंटेशनला नॅशनल लेव्हला मान्यता मिळाली. आणि निश्चितपणाने आम्हाला सगळ्या कोकणवासीयांना गौरव आहे.**

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वेरूळ इथं पर्यटन विकास महामंडळाच्या राष्ट्रकूट पर्यटक निवासाचं लोकार्पण पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते काल दूरदृश्यप्रणालीव्दारे झालं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं 'शाश्वत पर्यटन – एक सहयोग पूर्ण वाटचाल' या विषयावर काल कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक डॉ.शिवकुमार भगत, पत्र सूचना कार्यालयाच्या उपसंचालिका जयदेवी पुजारी स्वामी, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, पर्यटन मंत्रालयाच्या सहाय्यक संचालिका मालती दत्त यांनी ग्रामीण पत्रकारांशी संवाद साधत पर्यटन वाढीसाठी सहायक बाबींवर चर्चा केली.

दरम्यान, वेरूळ लेणी इथं दोन दिवसीय मल्टीमीडिया चित्रप्रदर्शन भरवण्यात आलं आहे. हे प्रदर्शन आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत, सर्वांसाठी खुलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात तेर इथं काल हेरिटेज वॉक घेण्यात आला. यात सहभागी नागरीकांनी त्रिविक्रम मंदिर, उत्तरेश्वर मंदिर, तीर्थकुंड, चैत्यगृह यासह दिवंगत रामलिंगप्पा लामतुरे शासकीय पुराणवस्तू संग्रहालयाला भेट देऊन माहिती जाणून घेतली.

****

नांदेड जिल्ह्यात नेरली कुष्ठधाम इथं सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या टाकीतील दुषीत पाणी प्यायल्याने पंधरा मुलांसह दोनशेहून जास्त गावकऱ्यांना विषबाधा झाली असून सहा जणांची प्रकृती गंभीर असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या रुग्णांना मध्यरात्री नांदेड शहरातील शासकीय रुग्णालयासह खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी घटनेची माहिती घेत आरोग्य यंत्रणांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

****

कानपूर इथं सुरू असलेल्या भारत आणि बांगलादेशदरम्यान दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात काल पहिला दिवसाचा खेळ पाऊस आणि पुरेशा प्रकाशाअभावी लवकर थांबवण्यात आला. बांगलादेशनं दिवसअखेर तीन बाद १०७ धावा केल्या आहेत.

****

मकाऊ खुल्या बॅडमिंटन महिला दुहेरीत त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या सामन्यात त्रिशा आणि गायत्री जोडीने तैवानच्या जोडीचा २१-१२, २१-१७ असा पराभव केला. आज उपांत्य फेरीत या जोडीचा सामना तैवानच्या अन्य एका जोडीशी होईल.

दरम्यान, पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत किदाम्बी श्रीकांतचा पराभव झाला.

****

लातूर जिल्ह्यातील वाडी-तांड्याच्या ठिकाणी असलेल्या शाळांमध्ये प्रत्येक शनिवारी बोलीभाषेत शिक्षणासाठी विशेष वर्ग घेतले जाणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी ही माहिती दिली. मुरुड इथं बंजारा बोलीभाषा-मराठी प्रमाणभाषा कृति पुस्तिकेच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवण्यासाठी त्यांच्या मातृभाषेतील शिक्षण उपयुक्त ठरत असल्याने, हा निर्णय घेतल्याचं सागर यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने पुढील ३० वर्षांसाठी तयार केलेल्या जलनितीचा मसुदा छत्रपती संभाजीनगर एम सी डॉट ओआरजी या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या जलनिती बाबत आपले आक्षेप आणि सूचना लेखी स्वरुपात महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात ६० दिवसांच्या आत दाखल करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात परंडा तालुक्यातला सीना कोळेगाव सिंचन प्रकल्प पूर्ण क्षमतेनं भरला आहे. धरणाचे १७ दरवाजे उघडून तीस हजार घनफूट प्रति सेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सुरू आहे

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणातून होणारा विसर्ग कमी करण्यात आला आहे. धरणाच्या १८ दरवाजातून सुमारे चौदा हजार ६७२ घनफूट प्रतिसेकंद वेगानं विसर्ग सुरू आहे.

****